# संशोधन प्रकल्पाचे शीर्षक स्पष्ट आणि लघुरुपात असावे - प्रो. डॉ. एन. एम. मुजावर

संशोधन प्रकल्प करत असताना संशोधनाचे शीर्षक हे स्पष्ट आणि लघुरूपात असणे आवश्यक आहे शीर्षकांमध्ये प्रमुख मुद्द्यांचा समावेश संशोधन अभ्यासासंबंधी सुस्पष्ट कल्पना वाचकास सहज उपलब्ध करून देतो. त्याचबरोबर संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टे, हायपोथेसिस आणि फाइंडिंग व सजेशन्स यामध्ये एकरूपता असावी या प्रमुख बाबींच्या सुयोग्य व स्पष्ट मांडणीमुळे संशोधन प्रकल्प उत्कृष्टरित्या तयार होऊ शकतो असे उद्गार  प्रो. डॉ. एन. एम. मुजावर यांनी श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी केले. एम. कॉम. आणि बी.बी.ए. च्या विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट वर्क, फिल्ड वर्क प्रकल्प अहवाल कसा तयार करावा या संबंधित मार्गदर्शन करण्यासाठी ते उपस्थित होते. संशोधन प्रकल्प करत असताना माहिती संगणक, एम. एस. एक्सेल, एम. एस. वर्ड आणि एस.पी.एस.एस. अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा व सॉफ्टवेअरचा उपयोग केल्यामुळे प्रश्नावलीद्वारे गोळा केल्या गेलेल्या माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण करणे सहज शक्य होते आणि संशोधन प्रकल्प अर्थपूर्ण बनवण्यास मदत होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पदव्युत्तर शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये संशोधन व संशोधन संबंधित अभ्यासक्रमावर अधिक भर देण्यात आला आहे. त्यामुळे एम. कॉम. भाग एक व भाग दोन आणि बी.बी.ए. भाग तीनमध्ये ओजेटी,फील्ड वर्क, फिल्ड प्रोजेक्ट वर्क यांचा सेमिस्टरमध्ये समावेश करण्यात आला आहे. अकाउंटिंग विषयाच्या पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्याचा वापर व्यवसाय संघटनेमध्ये कशा पद्धतीने केला जातो हे जाणून घेण्यासाठी प्रत्यक्ष व्यवसाय संघटनेमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांनी ज्ञान अर्जित करणे हा हेतू नवीन शैक्षणिक धोरणामध्ये आहे. संशोधन प्रकल्पामध्ये किती उद्दिष्टे असावीत, हायपोथेसिस, लिमिटेशन्स, स्कोप, सॅम्पल डिझाईनिंग, सॅम्पल सिलेक्शन, रिसर्च डिझाईन कोणते निवडावे, प्रकल्प अहवालाचा शेवट कसा असावा, संपूर्ण अहवालाची रचना या सर्व बाबीं संबंधी आवश्यक महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना करून दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यावेळी अध्यक्षस्थानि उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अधिक अधिक चांगले संशोधन पर शिक्षण घ्यावे हा उद्देश राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आहे यासाठी आजच्या कार्यक्रमाचे आयोजन त्यासाठीच करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी चिकित्सापूर्ण प्रत्येक गोष्टीचे निरीक्षण करून संशोधक वृत्तीने अभ्यास करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बी. एन. कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शनाची जबाबदारी अनुक्रमे मोहिनी अंचलिया आणि एस. आर. ठाकर यांनी पार पाडले. सदर कार्यक्रमासाठी एम. कॉम. बी.बी.ए. चे

विद्यार्थी तसेच ए. एस. सी. कॉलेज, डांगे कॉलेज, शेंदुरे कॉलेज हुपरी अशा इतर महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

